वृत्तप्रत्र निवेदन

मे.जॉन्सन अँण्ड जॉन्सन लिमिटेड मुंबई हे उत्पादीत व विक्री करीत असलेल्या विविध Baby Product (बालकांचे उत्पादने)बाबत अन्न व औषध प्रशासन, म.राज्य यांनी सदर कंपनीला कारणे दाखवा नोटीस बजावलेली होती.

सदरील कंपनीच्या जॉन्सन बेबी ऑईल या उत्पादनाच्या वापराने बालकाच्या डोक्यास फोड आल्याची तक्रार प्रशासनाला प्राप्त झाली होती. कंपनी हे उत्पादन बालकांच्या करीता खास म्हणून मसाजकरीता उपयुक्त असल्याचे दावे करते.

सदरील उत्पादनाबाबतची तक्रार तसेच त्यांच्या बालकांच्या या व इतर उत्पादनावरील दाव्यांची सत्यता पडताळण्याच्या दृष्टिने कंपनीला कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती.

चौकशीमध्ये कंपनीला जॉन्सन बेबी ऑईल बाबत जानेवारी २००४ ते फेब्रुवारी २००५ या कालावधीत एकूण ३९ बालकांना Skin Rashes आल्याच्या तक्रारी ग्राहकाकडून प्राप्त झाल्याचे आढळून आलेले आहे.

जॉन्सन बेबी ऑईल व त्यांची इतर बालकांची उत्पादने याबाबत कंपनी करीत असलेल्या दाव्यांची छाननी प्रशासनाने केलेली आहे.सदर छाननी मध्ये ,

१) जॉन्सन बेबी ऑईल व जॉन्सन बेबी हेअर ऑईल या उत्पादनामध्ये ९९% पेक्षा जास्त मिनरल ऑईल लाईट लिक्विड पॅराफिन आहे. परंतु कंपनी या सौंदर्य प्रसाधनांच्या लेबलवर ते दर्शविले जात नाही व ग्राहकांना या घटकाची व तेलामध्ये असलेल्या त्याच्या प्रमाणाची माहीती मिळत नाही.

२) भारतीय परंपरेत बालकांना वनस्पतीजन्य तेलाद्वारे जसे तीळ ऑईल ,खोबरेल तेल इत्यादी द्वारे मसाज केला जातो तथापि जॉन्सन बेबी ऑईल मध्ये Light Liquid Parafin हे Mineral oil आहे. ते पंरपरागत भारतीय वनस्पतीजन्य तेलाच्या तुलनेने मसाजसाठी उपयुक्त नाही. कंपनीचा सदर उत्पादन बालकांच्या मसाजसाठी सर्वोतोपरी उपयुक्त आहे हा दावा, कंपनीला वरील प्रमाणे १४ महीन्याच्या कालावधीत प्राप्त झालेल्या एकूण ३९ तक्रारी ,बेबी ऑईलबाबत विविध पुस्तकातील नमूद अभ्यास ,तज्ञांची मते, व वैद्यकिय अभ्यास विचारात घेता तो योग्य नाही असे प्रशासनाचे मत बनलेले आहे. जॉन्सन बेबी ऑईल हे त्वचेवर सौम्य आवरणासाठी व इमोलियंट म्हणून पाश्चिमात्य देशात वापरले जाते.तेथील बालकांना नॅपी डायपर वापरले जाते. सदरील नॅपीच्या वापराने बालकांच्या त्वचेला काहीवेळा स्कीन रॅशेस येतात त्यावर इमोलियंट म्हणून बेबी ऑईल वापरले जाते.

या उत्पादनामध्ये ०.१ % इतके जीवनसत्व अ व ड आहे हे घटकद्रव्य व मिनरल ऑईल ९९ % पेक्षा जास्त आहे सदरील बाब विचारात घेता या उत्पादनाच्या मसाजसाठी वापराने बालकांची वाढ व विकास होतो हा कंपनीचा दावा ग्राहकांची दिशाभूल करणारा आहे.

३) जॉन्सन बेबी लोशन या उत्पादनाने त्वचा मऊ होते तसेच वापरणारा तरूण दिसतो. असा दावा कंपनी करते सदरील दावा प्रौढांसाठी असल्याने बालकांच्यासाठी करणे योग्य नाही.

४) जॉन्सन बेबी मिल्क लोशन या उत्पादनाच्या वापराने बालकांच्या त्वचेसाठी आरोग्यदायी व त्वचा मऊ होते व गोरी होते असा दावा कंपनी करते बालकांची त्वचा मुळातच मऊ असते व त्यांच्या त्वचेचा रंग या उत्पादनाच्या वापराने गोरा होतो हे म्हणणे चुकीचे आहे.

५) जॉन्सन बेबी हेअर ऑईल या उत्पादनामध्ये ९९.८% इतके मिनरल ऑईल लाईट लिक्विड पॅराफिन आहे तसेच व्हिटामिन बी ५ हे नगण्य स्वरूपात आहे केसामध्ये ते शोषले जाऊन, केस आरोग्यदायी होतात हा कंपनीचा दावा चुकीचा व दिशाभूल करणारा आहे.

६) नोमोर टिअर्स बेबी शॅम्पू या उत्पादनाबाबत कंपनीने अमेरिकत प्रौढ वयोगटावर केलेल्या परिक्षणाआधारे ते बालकांच्या करीता खास उपयुक्त आहेत असा दावा केलेला आहे. सदर परिक्षण विचारात घेता हे उत्पादन प्रौढांकरीताच आहे.

७) जॉन्सन बेबी मिल्क सोप या उत्पादनामध्ये ०.१% इतके मिल्क प्रोटीन आहे. त्याद्वारे दुधाचे आरोग्यदायी परिणाम बालकांना मिळतात असा दावा कंपनी करते परंतु त्याबाबत समाधानकारक पुरावे कंपनी देऊ शकलेली नाही.

८) जॉन्सन बेबी मॉइस्चरायजर साबण या उत्पादनावर नारळ व खोबरेलतेल दर्शवून त्याचे चांगले गुण सदर उत्पादनात असल्याचे कंपनी दर्शविते परंतु उत्पादनाच्या पाठानुसार त्यामध्ये खोबरेल तेल नाही.

वरील प्रकारे कंपनी ग्राहकांची दिशाभूल करणारे दावे, जाहीरातीद्वारे, तसेच उत्पादनाच्या लेबल द्वारे करते.

कंपनी या उत्पादनात असलेल्या सर्व घटकद्रव्ये व त्यांची संख्या % हे लेबलवर नमूद करीत नाही. विशेषत: बेबी ऑईल व बेबी हेअर ऑईलमध्ये ९९.८% मिनरल ऑईल असताना देखील ते लेबलवर नमूद केले जात नाही.

वरील बेबी उत्पादने बालकांच्यासाठी असतात त्यांच्या वापर अनुषंगे परिणाम बालके व्यक्त करू शकत नाहीत. या बेबी प्रॉडक्टसची निवड त्यांच्या माता व तरूण पालक करीत असतात ही निवड पालक जाहीराती वगैरे पाहून उत्पादनाची निवड करतात. यामुळे पालकांना या सौंदर्य प्रसाधनाची निवड करताना त्यांच्या लेबलवर सर्व घटकद्रव्ये त्यांची संख्या याची माहीती पालकांना मिळणे आवश्यक आहे.

औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा हा केंद्रिय कायदा आहे व तो भारतातील सर्व राज्यांना लागू आहे. सदर कायद्यामध्ये सुधारणा व काही निर्देश अन्न व औषध प्रशासन महाराष्ट्र राज्य, अथवा

महाराष्ट्र शासनाकडून दिले जाऊ शकत नाही. म्हणून औषध नियंत्रक भारत सरकार यांना याबाबत औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० या कायद्या अंतर्गत योग्य त्या सुधारणा व निर्देश देण्यासाठी कळविण्यात आलेले आहे.त्याचप्रमाणे ग्राहकांना सौंदर्य प्रसाधनातील सर्व घटकद्रव्यांची माहीती त्यांच्या टक्केवारीसह सौंदर्य प्रसाधनाच्या लेबलवर माहीत होणे आवश्यक आहे. अशी प्रशासनाची भुमिका असून त्याबाबत वरील कायद्यात आवश्यक सुधारणा करण्यास सूचित केलेले आहे, जेणे करून भरतातील सर्व बेबी सौंदर्य प्रसाधनांना व त्यांच्या उत्पादकांना वरील सुधारणा व निर्देश लागू होतील.

तसेच अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, यांनी मे.जॉन्सन ॲण्ड जॉन्सन या कंपनीला ते करीत असलेल्या दाव्याबाबत तसेच सर्व साधारण ग्राहकाला त्यांच्या बेबी सौंदर्य प्रसाधनाबाबत माहीती मिळण्याच्या दृष्टिने खालील निर्देश दिलेले आहेत.

(१) त्यांनी त्यांच्या बेबी उत्पादनाच्या लेबलवर ग्राहकांच्या माहीतीसाठी या सौंदर्य प्रसाधनाच्या वापराने विशेषत: मिनरल ऑईलयुक्त सौंदर्य प्रसाधनाच्या वापराने Side effect म्हणून रिॲक्शन आल्यास त्याबाबत घ्यावयाची सुरक्षा काळजी ग्राहकांना दयावी.

(२) सौंदर्य प्रसाधनाच्या वापराने मिळणा-या फायद्याबाबत जे कंपनी जाहीरातीद्वारे व लेबलद्वारे दावे करते.असे दावे करू नयेत. परंतु कंपनी असे दावे करू इच्छित असल्यास औषध नियंत्रक भारत सरकार यांची लेखी मान्यता घ्यावी.जेणे करून दाव्याबाबत औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० चे कलम १७ सी(सी)चा भंग होणार नाही.

(३) कंपनी करीत असलेल्या सर्व दाव्यांची मान्यता औषध नियंत्रक भारत सरकार यांचेकडून घेण्यासाठी संस्थेला १.८.२००५ पर्यंत मुदत देण्यात आलेली आहे. वरील कालावधीत कंपनीने औषध नियंत्रक भारत सरकार यांच्याकडून ते करीत असलेल्या दाव्याबाबत मान्यता न घेतल्यास १.८.२००५ नंतर त्यांचे बेबी उत्पादने महाराष्ट्रात विक्रीसाठी उत्पादन करण्याच्या बंदीबाबत अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, योग्य ती पुढील कारवाई घेईल.

३) संस्था जर वरील मुद्यांची पुर्तता न करता व सौंदर्य प्रसाधनातील बेबी हा शब्द वगळून ती सर्व साधारण सौंदर्य प्रसाधन म्हणून बाजारात उत्पादन व विक्री करू इच्छित असल्यास तसे त्यांना करता येईल .

(४) अशाच प्रकारे इतर उत्पादकांना ज्यांना प्रशासनाने त्यांचे बेबी उत्पादनासाठी नोटीस दिलेली आहे जसे विप्रो बेबी सॉफ्ट ऑईल ,इत्यादींना त्यांनाही असाच प्रकारचे निर्देश लागू होत आहेत.

* * *